# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 21 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २१ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर रवाना झाले. ४३ वर्षांतील भारतीय पंतप्रधानांची ही पहिलीच कुवेत भेट आहे. दोन्ही देश केवळ मजबूत व्यापार आणि ऊर्जेबाबतच भागीदार नाहीत तर पश्चिम आशिया क्षेत्रातील शांतता, सुरक्षा, स्थैर्य आणि समृद्धी तसंच समान हितसंबंधातही भागीदार आहेत असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

***

संसद भवनात झालेल्या निदर्शनादरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर कथित हल्ला आणि भारतीय जनता पक्षाच्या दोन खासदारांना दुखापत झाल्याच्या प्रकरणाचा तपास दिल्ली पोलिसांनी गुन्हे शाखेकडे वर्ग केला आहे. भाजपच्या तक्रारीवरून राहुल गांधींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. भाजप खासदार अनुराग सिंह ठाकूर यांच्यासह खासदार बन्सुरी स्वराज आणि हेमांग जोशी यांनी गुरुवारी संसद मार्ग पोलिस ठाण्यात राहुल गांधींविरोधात तक्रार दाखल केली होती.

दरम्यान, राष्ट्रीय महिला आयोगानेही नागालँडच्या महिला खासदार फांगनॉन कोन्याक यांच्यासोबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या कथित गैरवर्तनाची स्वत:हून दखल घेतली आहे.

****

जयपूर गॅस टँकर दुर्घटनेतील मृतांची संख्या १४ वर पोहोचली आहे. या दुर्घटनेतील २७ जखमींवर एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असून सहा जण सध्या कृत्रिम जीवरक्षक प्रणाली– व्हेंटीलेटरवर आहेत. जयपूरचे जिल्हाधिकारी जितेंद्र कुमार सोनी यांनी या घटनेच्या चौकशीसाठी संयुक्त तपास समिती स्थापन केली आहे. काल सकाळी जयपूर–अजमेर महामार्गावर हा अपघात झाला होता.

****

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपूरच्या दीक्षाभूमी इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं दर्शन घेतलं. दीक्षाभूमी आणि मुंबईची चैत्यभूमी आमच्यासाठी महत्वाचं स्थान आहे, इथं आल्यानंतर ऊर्जा आणि प्रेरणा मिळते असं त्यांनी यावेळी म्हटलं. बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही देशाचा कारभार चालवत आहोत, राज्य शासनाच्या वतीनं तालुकानिहाय संविधान भवन बांधण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

परभणी इथल्या अप्रिय घटनेच्या निषेधार्थ आज आंबेडकरी संघटनांच्या वतीनं पुकारण्यात आलेल्या जालना बंदला संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. शहराल्या मुख्य बाजारातली बहुतांश व्यापारी प्रतिष्ठानं बंद असून सर्वत्र पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मस्साजोग गावात देशमुख कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केलं. यावेळी पक्षाचे नेते राजेश टोपे उपस्थित होते.

****

दरम्यान, बीडच्या पोलिस अधिक्षकपदी नवनीत कॉवत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कॉवत सध्या छत्रपती संभाजीनगर इथं उपायुक्त असुन त्यांची पोलिस अधिक्षक म्हणून ही पहिलीच नियुक्ती आहे. ते २०१७ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. अधिक्षक अविनाश बारगळ यांच्या बदलीची घोषणा काल सभागृहात करण्यात आली होती. त्यानंतर बीडला पोलिस अधिक्षक म्हणून शासनाने नवनीत कावत यांची या पदावर नियुक्ती केली आहे.

****

राज्यात ४२ मंत्री आहेत, पण त्यातील मुख्यमंत्री वगळता उर्वरित मंत्री अजूनही बिनखात्याचेच आहेत, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे गटनेते भास्कर जाधव यांनी केली आहे. कालपासून सुरू असलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत आज ते बोलत होते. विदर्भात गेल्या अकरा महिन्यात २ हजार ३३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, गेल्या तीन वर्षांत सात हजार आत्महत्या झाल्या. शेतमालाला योग्य आणि हमी भाव सरकार देत नाही, कृषी विमा योजनेत हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सत्ताधारी सदस्यच करीत

आहे, ही गंभीर परिस्थिती असून याची उत्तरं सरकारनं द्यावीत अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

****

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ११ कोटी ३२ लाख रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला. सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी काल रात्री उशिरा ही कारवाई केली. या प्रकरणी बँकॉकहून येणाऱ्या एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलं आहे.

****

शिक्षकांना शैक्षणिक कामांतून मुक्त करा, अशी आग्रही मागणी नागपूर हिवाळी अधिवेशनात नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी विशेष उल्लेखाद्वारे केली आहे. सतत चालणाऱ्या मतदार नोंदणी आणि इतर सर्वेक्षण प्रक्रियेत शिक्षकांना गुंतवून अशैक्षणिक कामे दिली जात असल्यानं राज्यातील शिक्षकांत तीव्र असंतोष असल्याचं त्यांनी यावेळी नमुद केलं.

****

आज पहिला जागतिक ध्यान दिवस सर्वत्र साजरा केला जात आहे. लोकांना शांती आणि कल्याणाच्या भावनेनं जीवन जगण्याची प्रेरणा देण्याच्या उद्देशानं हा दिवस साजरा करण्याचं ठरवण्यात आलं आहे. संयुक्त महासभेनं या संदर्भात भारतानं सहप्रायोजित केलेला ठराव नुकताच एकमतानं मंजूर केला होता. आज या निमित्तानं न्यूयॉर्क इथल्या संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात भारताच्या स्थायी मिशनचे प्रतिनिधी पार्वतनेनी हरीश यांनी एका कार्यक्रमाचं आयोजन केलं. लक्षावधी लोक उपस्थित असलेल्या या कार्यक्रमात, प्रसिद्ध अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांनी ध्यान अभ्यासाचं नेतृत्व केलं.

****